# मेट्रोचे बॅरिकेड हटवणार

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

गणपतीसाठी विविध विभागांमध्ये होणारी मंडपांची उभारणी आणि गणपतींचे दर्शन घेण्यासाठी होणारी गर्दी लक्षात घेता, मेट्रोचे काम सुरू असलेल्या भागातील काही बॅरिकेड्स तात्पुरत्या स्वरूपात दूर करण्याचा तसेच काही मार्गिका खुल्या ठेवण्याचा निर्णय मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने घेतला आहे.

गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत मंडळांना सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे. त्यानुसार माहीम शितलादेवी येथील एक मार्गिका खुली केली जाणार आहे. सांताक्रूझ येथील एका मंडळाला मंडप उभारण्यासाठी रस्ता उपलब्ध करून दिला जाईल. गिरगाव व काळबादेवी तसेच एअरपोर्ट येथील मेट्रोच्या कामाचे बॅरिकेड्स हलवण्यात येतील. या विभागांव्यतिरिक्त मेट्रो मार्ग जात असलेल्या अन्य विभागांमध्ये मेट्रोच्या कामामुळे गणेशोत्सवात कोणताही अडथळा येत नाही. ज्या विभागात गरज असेल तेथील मंडळांनी त्यांचे म्हणणे कॉर्पोरेशनकडे मांडले असून त्यानुसार त्यांना जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे.